परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 89 | बुधवार दि. 22 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



# महिलांचा हक्क नाकारण्याची किंमत विरोधकांना मोजावी लागेल - ना. पंकजाताई मुंडे

## ठाण्यात पत्रकार परिषद ; महिला आरक्षणाला विरोध हे अत्यंत निषेधार्ह




मुंबई दि. 21 --महिला आरक्षण विधेयक नाकारले गेले, तेव्हा देशातील प्रत्येक महिलेला प्रताडित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याचा केंद्रबिंदू म्हणजे वंचितांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. महिलांचा हक्क नाकारणे हे अत्यंत निषेधार्ह असून काँग्रेससह सर्व विरोधकांना याची किंमत मोजावी लागेल असा इशारा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेतून दिला. काँग्रेस पक्ष देशाला स्वतःची मालमत्ता समजतो, हीच त्यांची मानसिकता आहे' असंही त्यांनी स्पष्ट केलं.

ठाणे येथे भाजप विभागीय कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या. भाजप नेत्या माधवी नाईक, जिल्हाध्यक्ष संदीप लेले तसेच समीरा भारती, स्वप्राली साळवी, वंदना डोंगरे, वनिता बोथपगारे आदी महायुतीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ला विरोध करणाऱ्या काँग्रेस व अन्य विरोधी पान 3 वर



# सांगता सभेत सुनेत्रा पवारांचा कंठ दाटला, पण भावना आवरत म्हणाल्या, "माझं सर्वस्व हरवलंय!"



बारामती विधानसभा पोटनिवडणुकीकरता आजचा शेवटचा दिवस आहे. बारामतीच्या ...प्रांगणात पोटनिवडणुकीसाठी सांगता सभा पार पडत आहे. या सभेकरता राज्यभरातील सत्ताधारी आणि विरोधातील अनेक नेते उपस्थित आहेत. यावेळी भाषण करताना सुनेत्रा पवारांचा कंठ दाटून आला. पण भावनेच्या भरात अश्रू डोळ्यांतून ओघळण्याआधीच त्यांनी त्यांच्या भावना आवरल्या आणि भाषण सुरू ठेवलं.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, "आज मी इथे उभी आहे, महायुतीचा उमेदवार म्हणून.. फक्त उमेदवार म्हणूनच नाही तर अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांची जबाबदारी घेऊन. दादा गेले पण त्यांची स्वप्न अजूनही जिवंत आहे. त्यांची स्वप्न पूर्ण करण्याकरता मी आज रणांगणात उतरली आहे. ही लढाई सोपी नाही. पण मी एकटीही नाही. कारण मला विश्वास आहे, माझ्या मागे संपूर्ण बारामतीकरांची ताकद उभी आहे. ही माती माझी आहे. तुम्ही माणसं माझी आहात. तुमचा विकास हाच दादांप्रमाणे माझाही ध्यास आहे. आज मी तुमच्याकडे मत मागायला येथे उभे राहिले नाही. मी तुमच्याबरोबर नातं टिकवायला पान 3 वर

# आज ठळक

## शरद पवार मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे मंगळवारी ब्रिच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती स्थिर असली तरी त्यांच्या तातडीने विविध तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्याचा अहवाल आल्यानंतरच पुढील उपचाराबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

शरद पवार यांना नियमित तपासणी आणि काही वैद्यकीय चाचण्यांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्या विविध चाचण्या करण्यात आल्या असून, अहवाल आल्यानंतरच त्यांच्या प्रकृतीबाबत स्पष्टपणे कळेल, अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना दिली.

दरम्यान, शरद पवार यांना मागील महिन्यातही प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुण्यातील रुग्णालयात दाखल केले होते. काही दिवस उपचार केल्यानंतर त्यांना घरी पाठविण्यात आले होते. मात्र, पुन्हा एकदा मंगळवारी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. तसेच शरद पवार यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने त्यांचा बारामती दौराही रद्द करण्यात आला आहे.शरद पवार यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. त्यांच्या वयाचा पान 3 वरw

## विधानपरिषद निवडणूक 2026 : उद्धव ठाकरेंचा नकार? बाळासाहेब थोरातांचे नाव चर्चेत



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था, राज्यसभा निवडणूक आणि विधानसभा पोटनिवडणुकीचा उडालेला धुरळा शांत होत असतानाचा विधानपरिषदेच्या 9 जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीचे वातावरण तापले आहे. विधानसभेतील सध्याचे पक्षीय बलाबल पाहता सत्ताधारी महायुतीचे पारडे जड दिसत आहे. या 9 जागांपैकी तब्बल 8 जागा महायुती सहज जिंकेल असे चित्र आहे. यामध्ये भाजप 5, शिवसेना 2, आणि राष्ट्रवादी काँग्रेस 1 जागा जिंकू शकते.

दुसरीकडे, महाविकास आघाडीकडे 46 आमदार आहेत. त्यामुळे त्यांचा एक उमेदवार निवडून येऊ शकतो. या जागेवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दावा केला आहे. पण उद्धव ठाकरे यांनीच पुन्हा निवडणूक लढवावी अशी अट काँग्रेसने टाकली आहे. मात्र उद्धव ठाकरे ही निवडणूक लढण्यास उत्सुक नसून ते विधानपरिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नावासाठी आग्रही असल्याची माहिती आहे.मात्र, काँग्रेसकडून दानवे यांच्या नावाला पान 3 वर

# स्व.अजितदादा पवार यांच्या नावाने वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापनेचा निर्णय घेणारी परळी वैजनाथ नगर परिषद ठरणार पहिली!

## » अभिनव सेवाउपक्रम: परळी नगर परिषदेच्या वतीने 'स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष' होणार स्थापन





परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

परळीत नगर परिषद क्षेत्रातील नागरिकांना शासकीय वैद्यकीय योजनांचा लाभ सुलभ, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने मिळावा या उद्देशाने नगर परिषद कार्यालयात "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यास न.प.च्या स्थायी समितीने एकमताने मंजुरी दिली आहे.नगर परिषद स्थायी समितीच्या बैठकीत यासंदर्भातील ठराव मंजूर करण्यात आला असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे. दरम्यान, अशा प्रकारचा स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेणारी परळी नगर परिषद महाराष्ट्रात पहिली नगर परिषद ठरणार आहे.

नागरिकांना विविध आरोग्य योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया आणि पाठपुरावा यासाठी एकाच ठिकाणी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष" स्थापन करण्यात येणार आहे.या कक्षाच्या स्थापनेसाठी लागणारा खर्च नगर परिषद निधीतून किंवा शासन अनुदानातून मंजूर करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार आरोग्य विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय व इतर यंत्रणांशी समन्वय साधून नागरिकांना अधिकाधिक सुलभ वैद्यकीय सहाय्यता पान 3 वर

**लाभार्थ्यांचा शासनस्तरावर पाठपुरावा करण्यासाठी एकाच छताखाली सर्व सेवा**

# व्यापारी व नागरिकांना विश्वासात घेऊन सर्वांना सारखा न्याय देऊन अतिक्रमण हटाव मोहीम राबवावी

## परळीत अतिक्रमण हटाव मोहिमेत पक्षपातीपणा नको; माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांची मागणी





परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

परळी नगर परिषदेच्या वतीने शहरात सध्या राबवण्यात येत असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेत पक्षपातीपणा करू नये. रस्त्यावरील वाढत्या अतिक्रमणांमुळे भाविक आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे हे अतिक्रमण कोणत्याही भेदाभेदाशिवाय सरसकट काढण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केलीआहे. व्यापारी व नागरिकांना विश्वासात घेऊन, सर्वांना सारखा न्याय देऊन ही मोहीम राबवावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते पान 3 वर

# बीड एसीबीची 'फिल्डिंग' यशस्वी! 18 हजार स्वीकारणाऱ्या महावितरणच्या महिला अभियंता अटकेत




कडा (जि. बीड): राज्यात एकीकडे सौर ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध सवलती दिल्या जात असताना, महावितरणचे अधिकारी मात्र याच प्रकल्पांच्या नावाखाली वसुली करत असल्याचे उघड झाले आहे. आष्टी येथील महावितरण कार्यालयातील सहायक अभियंता कोमल अर्जुन शिंदे यांना 18 हजार रुपयांची लाच स्वीकारताना बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पान 3 वर



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल राज्य सचिव भास्कर (नाना) रोडे यांनी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले असताना त्यांचा सत्कार करण्यात आला.

# परळीतील सांची बौद्ध विहारात भव्य दिव्य भीमगीतांचा सांस्कृतिक महासोहळा

## युवा नेते सचिनभाऊ कागदे यांच्या पुढाकारातून जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रम; नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन






परळी वैजनाथ (प्रतिनिधी) – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त परळी शहर 'जय भीम'च्या जयघोषाने दुमदुमणार आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिनभाऊ कागदे यांच्या पुढाकारातून शिवाजीनगर येथील सांची बौद्ध विहार, थर्मल रोड येथे भव्य दिव्य भीमगीतांचा सांस्कृतिक महासोहळा आयोजित करण्यात आला असून, गुरुवार दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात रंगणार आहे.

या सोहळ्यात 'काळजावर कोरले नाव' फेम अजय देहाडे यांच्यासह चेतनकुमार चोपडे, सचिन भुईगळ, विजयजी पवार, विकास साळवे यांसारखे नामवंत गायक आपल्या दमदार आवाजातून भीमगीत व बुद्धगीत सादर करणार आहेत. त्यांच्या सुरेल सादरीकरणातून बाबासाहेबांच्या विचारांचा, संघर्षाचा आणि पान 3 वर

# परळीत ब्राह्मण सभेच्या वतीने आज 46 वा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा

## ➡ विशेष गौरव: नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व समाजातील नवनिर्वाचित प्रतिनिधींचा होणार सत्कार




परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

येथील ब्राह्मण बहुद्देशीय सभेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 46 व्या सामुदायिक उपनयन संस्कार (मुंज) सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. आज बुधवार, दिनांक 22 एप्रिल 2026 रोजी सकाळी 8:52 च्या शुभ मुहूर्तावर प्रभू वैद्यनाथ मंदिर परिसरातील दर्शन मंडप येथे हा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यात परळीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी व समाजातील लोकप्रतिनिधींचा, नवनिर्वाचित प्रतिनिधींचा सत्कार सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात येणार आहे.

गेल्या 45 वर्षांची प्रदीर्घ आणि उज्ज्वल परंपरा लाभलेल्या या सोहळ्याला संपूर्ण महाराष्ट्रात विशेष मान्यता आहे. अत्यंत शिस्तबद्ध नियोजन आणि मांगल्याच्या वातावरणात होणारा हा उपक्रम परळी नगरीचे पान 3 वर



**• 19 बटूंचा सामुदायिक उपनयन संस्कार सोहळा**

विराज विश्वांभर देशमुख (मोगरकर), अभिमन्यु अनिल पांडे छ. संभाजीनगर, कृष्णा विनोद बांगर,चिन्मय अनिल बांगर, आकाश विठ्ठल पत्की टाकळगाव, अनंत विठ्ठल पत्की टाकळगाव,शिवम अशोक पुजारी, कृष्ण नंदकुमार भोपे धामोणी, आनंद श्रीकांत जोशी, मंगेश सुरेंद्र जोशी सेलु, अणर्व राजेश शेटे, शुभम मनिष पाटील कौठळी, गौरांग अमोल जोशी, स्वप्निल सतिश कुलकर्णी आदिलाबाद, समर्थ सचिन पाटील चाकुर, वरुण विजयराव देशपांडे परभणी, शंकर आबासाहेब घुगे पाथरुड, शुभम आबासाहेब

# आदिवासी आणि आश्रम शाळा : काल, आज आणि उद्या

मी प्रा. डॉ. दिलीप बंजारा मी माझे शिक्षण आश्रम शाळेतून पूर्ण केलो. माझे ही शिक्षण माझेच काय माझ्या पूर्ण खानदानातील व्यक्तींचे शिक्षण आश्रम शाळेत झालेला आहे. आश्रम शाळेत शिक्षण घेऊन माझ्या घरातील व्यक्ती मोठ मोठ्या पदावर विराजमान झाले. मी या शाळेमध्ये शिकल्यामुळे शाळेबद्दल काहीतरी लिहावसं वाटलं म्हणून मी हा लेख लिहिण्याचा धाडस करत आहे. “आश्रम शाळा काल आज आणि उद्या” हा शीर्षक यासाठी मी मुद्दाम दिलेला आहे की, आज आश्रम शाळेची सद्यस्थिती काय आहे? आणि पूर्वी काय होती याचा मी थोडक्यात आढावा घेतला आहे. या लेखाचे वाचन केल्यानंतर हा लेख आपणास आवडेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

आश्रम शाळा या भारतीय शिक्षण व्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहेत. विशेषतः आदिवासी, भटक्या व विमुक्त जमातीतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी या शाळांची निर्मिती करण्यात आली. शिक्षणासोबतच निवास, अन्न व इतर मूलभूत सुविधा देणाऱ्या या शाळा समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी मोठे साधन ठरल्या आहेत. “आश्रम शाळा : काल, आज आणि उद्या” या विषयाचा विचार केल्यास त्यांचा प्रवास आणि बदल स्पष्टपणे दिसून येतो.

प्राचीन काळात शिक्षणाची गुरुकुल पद्धती अस्तित्वात होती. या पद्धतीत विद्यार्थी गुरुंच्या आश्रमात राहून शिक्षण घेत असत. त्यातूनच “आश्रम” ही संकल्पना उदयास आली. मात्र, स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासी व दुर्बल घटकांना शिक्षणाची संधी फारच कमी प्रमाणात उपलब्ध होती. समाजातील विषमता, गरिबी आणि दुर्गम भागामुळे अनेक मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागत होते. या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी स्वातंत्र्यानंतर सरकारने विशेष प्रयत्न सुरु केले. भारतीय संविधानाने सर्वांना शिक्षणाचा अधिकार दिल्यानंतर आदिवासी भागात आश्रम शाळांची स्थापना करण्यात आली. या शाळांचा मुख्य उद्देश म्हणजे दुर्गम भागातील मुलांना मोफत व सुलभ शिक्षण उपलब्ध करून देणे हा होता. त्यामुळे आश्रम शाळा या सामाजिक न्यायाचे प्रभावी साधन ठरल्या. सध्याच्या काळात आश्रम शाळांचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारले आहे.




महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये शेकडो आश्रम शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, निवास, भोजन, गणवेश, पुस्तके आणि आरोग्य सुविधा पुरवल्या जातात. काही ठिकाणी इंग्रजी माध्यम आणि आधुनिक शिक्षण पद्धतींचाही अवलंब करण्यात येत आहे. क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अनेक आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात यशस्वी होत आहेत. तथापि, आश्रम शाळांपुढे काही गंभीर समस्या देखील आहेत. अनेक ठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे, तर काही शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव जाणवतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सुरक्षा आणि पोषणासंबंधी काही वेळा समस्या निर्माण होतात. व्यवस्थापनातील त्रुटी आणि देखरेखीचा अभाव यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. त्यामुळे केवळ संख्या वाढवण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे. भविष्यात आश्रम शाळा अधिक सक्षम आणि आधुनिक बनण्याची गरज आहे. डिजिटल शिक्षण, स्मार्ट क्लासरुम, संगणक व तंत्रज्ञानाचा वापर यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान मिळू शकते. कौशल्य विकास, व्यावसायिक शिक्षण आणि करिअर मार्गदर्शन यावर भर दिल्यास विद्यार्थ्यांचे भवितव्य अधिक उज्ज्वल होईल. तसेच प्रशिक्षित व समर्पित शिक्षक, सुरक्षित व स्वच्छ वसतिगृह, चांगली आरोग्य सेवा आणि योग्य व्यवस्थापन यांची आवश्यकता आहे. “एकलव्य मॉडेल निवासी शाळा” सारख्या उपक्रमांमुळे आश्रम शाळांची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न सुरु आहे अशा प्रकारे, आश्रम शाळांचा प्रवास “काल” पासून “आज” आणि “उद्या” पर्यंत प्रगतीचा आहे. या शाळांनी समाजातील दुर्बल घटकांना शिक्षणाची संधी देऊन त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. भविष्यात योग्य नियोजन, सुधारणा आणि तंत्रज्ञानाचा वापर यामुळे आश्रम शाळा अधिक प्रभावी ठरतील. त्यामुळे आश्रम शाळा या केवळ शिक्षण संस्था नसून सामाजिक परिवर्तनाचे एक महत्त्वाचे साधन आहेत.

आश्रम शाळे पुढील समस्या आणि आव्हाने:-

आश्रम शाळा या आदिवासी व दुर्बल घटकांच्या शिक्षणासाठी महत्त्वाच्या असल्या तरी त्यांच्या पुढे अनेक समस्या आणि आव्हाने उभी आहेत. सर्वप्रथम, अनेक ठिकाणी पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो. वसतिगृह, स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे आणि आरोग्य सुविधा अपुरी असतात. दुसरे म्हणजे, शिक्षकांची कमतरता व प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव ही गंभीर समस्या आहे, ज्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होतो.

तिसरे म्हणजे, विद्यार्थ्यांच्या पोषण व आरोग्याशी संबंधित समस्या अनेकदा समोर येतात. योग्य आहार व वैद्यकीय सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासात अडथळे निर्माण होतात. याशिवाय, काही ठिकाणी व्यवस्थापनातील त्रुटी, भ्रष्टाचार आणि देखरेखीचा अभाव यामुळे योजनांचा योग्य लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही.तंत्रज्ञानाच्या युगातही अनेक आश्रम शाळांमध्ये डिजिटल शिक्षण साधनांचा अभाव आहे, त्यामुळे विद्यार्थी आधुनिक शिक्षणापासून मागे राहतात. तसेच, दुर्गम भागातील शाळांमुळे वाहतूक व संपर्काच्या अडचणी निर्माण होतात.

या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी सरकारने सुविधा सुधारणा, प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक, तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रभावी देखरेख यावर भर देणे अत्यावश्यक आहे.

**डॉ. बंजारा दिलीप लालू**
**सहाय्यक प्राध्यापक महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर तालुका अहमदपूर जिल्हा. लातूर.**



# आमचा नातू – आमच्या म्हातारपणाचं टॉनिक

**डॉ. दशरथ भोसले**

**• आयुष्याच्या उत्तरार्धात मिळणारे खरे सुख हे नातवंडांच्या सहवासात दडलेले असते. आमच्या आयुष्यातही असा आनंद आमच्या नातू युवराजच्या रूपाने आला. जन्मत:च गंभीर अडचणींना सामोरे गेलेल्या या बाळाने संघर्षातून जीवन जिंकले. त्याच्या प्रत्येक टप्प्यावर आम्ही आशा, भीती आणि आनंद अनुभवला. आज तो आमच्या म्हातारपणाचा खरा आधार आणि आनंदाचे टॉनिक ठरला आहे.**

•

प्रस्तावना:

श्री. नितीनचा त्याच्या आईला फोन आला. आवाजात स्पष्ट चिंता होती. “आई, सौ. वैशालीची प्री-मॅच्युअर डिलिव्हरी झाली. बाळाचे वजन अवघे साडेबाराशे ग्रॅम आहे. तळहातावर मावेल एवढं छोटं बाळ आहे. बाळाला काचेच्या पेटीत ठेवले आहे. सतत इंजेक्शन्स देत आहेत. आम्ही खूप घाबरलो आहोत. आई, तू लगेच निघ.” हा फोन ऐकताच आमच्या मनात भीतीचं वादळ उठलं. सौ. मंगल आपल्या सुनेला आधीपासूनच सांगत होती की सातवा महिना लागलाय, विश्रांती घे, टू-व्हीलर चालवू नकोस; पण हल्लीची सुशिक्षित पिढी सगळंच ऐकेल असं नाही. त्यामुळे आठवा महिना सुरु होण्याआधीच बाळाचा जन्म झाला. आम्ही डॉक्टरांना भेटलो. त्यांनी आम्हाला धीर दिला—“आम्ही 500 ग्रॅम वजनाची बाळंही वाचवली आहेत. अपुऱ्या दिवसांची बाळं खूप हुशार असतात.” त्यांच्या शब्दांनी आशेचा किरण दिसला, पण मनातील काळजी मात्र पूर्णपणे कमी झाली नव्हती.

महिन्याच्या आतच डॉक्टरांनी सांगितले की बाळाच्या हृदयातील शुद्ध-अशुद्ध रक्तवाहिन्यांची पूर्ण वाढ झालेली नाही आणि ऑपरेशन करावे लागेल. ऑपरेशन थिएटरबाहेर आम्ही रामरक्षा म्हणत बसलो होतो. काचेच्या लिफ्टमधून बाळ दिसत होतं—ऑक्सिजन, सलाईन... ते दृश्य पाहून मन भरुन आलं. थोड्याच वेळात डॉक्टर बाहेर आले. आम्ही डोळ्यात पाणी आणून विचारलं, “डॉक्टर, आमचं बाळ कसं आहे?” त्यांनी शांतपणे सांगितलं, “ऑपरेशन यशस्वी झालं आहे. घाबरु नका. थोड्या वेळात बाळ शुद्धीवर येईल.” त्या क्षणी आमच्यावरचा डोंगर हलका झाल्यासारखा वाटला. दवाखान्यात भगवान श्रीकृष्णांची सुंदर मूर्ती होती. आम्ही हात जोडून प्रार्थना केली—“देवा, बाळ दिलं आहेस तर त्याला दीर्घायुष्य दे.” मनात विचार आला—इतक्या छोट्या बाळाला ना आईचं दूध, ना आईची ऊब; सतत इंजेक्शन्स, एसीमध्ये ठेवलेलं बाळ आणि प्रत्येक क्षणी जगण्यासाठी चाललेला संघर्ष. पण लगेच श्रीकृष्णाच्या जीवनाची आठवण झाली—जन्मत:च संघर्ष, यमुना पार, पूतनाचा प्रसंग, कंसाचा धोका—आणि मनाला धीर मिळाला.

तीन महिन्यांनी डॉक्टरांनी बाळाला घरी आणण्याची परवानगी दिली. पुढील तीन वर्षे संसर्ग टाळण्यासाठी आजी सौ. मंगलने एका खोलीत त्याची अत्यंत काळजी घेतली. त्या काळात प्रत्येक दिवस हा कसोटीचा होता. तीन वर्षांनी बाळ पूर्णपणे ठणठणीत झालं. बारसं करून त्याचं नाव “युवराज” ठेवलं. दापोलीत आल्यावर सुरुवातीला बाळ बोलत नव्हतं, त्यामुळे आम्ही चिंतेत होतो. काही उपचार केल्यानंतर एके दिवशी त्याने पहिला शब्द उच्चारला—“आई!” तो क्षण आमच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा आणि समाधानाचा होता.

हळूहळू युवराज खूप बोलका आणि जिज्ञासू झाला. दुसरीपासूनच त्याला शास्त्रज्ञांची माहिती, शोधांची माहिती, तसेच आध्यात्मिक पुस्तके देण्यास सुरुवात केली. त्याच्या प्रश्नांचा पाऊस सुरु झाला—न्यूटनचा शोध काय, विमानातून पृथ्वीचा मॅग्नेट दिसतो का, भूकंप झाल्यावर तो हलतो का, बेंजामिन फ्रँकलिनने काय शोध लावला, अब्राहम लिंकन कोण होते—असे प्रश्न तो विचारायचा. अनेक वेळा शिक्षकही गोंधळून जायचे, आणि शेवटी तो स्वत:च उत्तर सांगायचा. त्याची जिज्ञासा पाहून आम्हालाही आनंद वाटायचा आणि आश्चर्यही वाटायचं.

एकदा शाळेतून फोन आला की सुटीत युवराजने दप्तरातून दोन खेळण्याच्या तलवारी काढून लढाई खेळायला सुरुवात केली होती. घरी विचारल्यावर त्याने सांगितलं, “हा माझा गनिमी कावा! मी झोपेचं सोंग घेतलं होतं. तुम्ही झोपल्यावर तलवारी दप्तरात ठेवल्या.” त्याची ही कल्पकता पाहून आम्ही थोडं रागावलो, पण मनोमन हसलोही. त्याचे प्रयोगही तितकेच गंमतीशीर होते. एकदा व्हिक्समध्ये मध आणि हळद मिसळून त्याने स्वत:चं “औषध” तयार केलं. दुसऱ्या वेळी दुधात कुंकू आणि हळद टाकून “आईस्क्रीम” बनवण्यासाठी डिप फ्रीजमध्ये ठेवलं. त्याच्या या उद्योगांमुळे घरात हास्याचे क्षण निर्माण व्हायचे.

एकदा बागेत काम करताना मुंग्या चावल्यावर आजी म्हणाली, “काळ्या मुंग्या चावत नाहीत.” त्यावर तो लगेच म्हणाला, “मग लाल मुंग्या राक्षसाच्या असतात का?” अशा निरागस प्रश्नांना उत्तर देताना आम्ही थक्क व्हायचो. अकरा वर्षांचा झाल्यावर त्याने “मॅनिफेस्टेशन” या विषयावर भाषण देण्याची तयारी केली. पहाटे उठून ध्यानधारणा करणे, मंदिरात जाऊन साधना करणे—हे त्याचे नित्याचे झाले. सिंहगड रोडवरील सभागृहात जवळपास 300 लोकांसमोर त्याने कोणत्याही नोट्सशिवाय अडीच तास सलग भाषण केलं. लोक मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. कार्यक्रमाच्या शेवटी काही लोकांनी स्वेच्छेने त्याला पैसे दिले, आणि त्यातून त्याने आजोबांना बॅग भेट दिली—हा त्याच्या प्रेमाचा सुंदर नमुना होता.

आज आम्ही सत्तरी पार केली आहे, पण युवराजमुळे आमच्या आयुष्याला नवं चैतन्य मिळालं आहे. त्याच्यासोबत खेळणे, अभ्यास करणे, रंगपंचमी साजरी करणे—या सगळ्यामुळे आम्ही आमचं म्हातारपण विसरुन पुन्हा बालपण अनुभवत आहोत. पत्नीचा बीपी कमी झाला, गुडघेदुखीही कमी झाली. खरंच, नातवंडं ही आयुष्याला नवसंजीवनी देणारी असतात. शेवटी, पुण्यातील KEM हॉस्पिटलमधील डॉक्टरांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो. 500 ते 1200 ग्रॅम वजनाच्या बाळांना वाचवणे हे अत्यंत कठीण आणि महान कार्य आहे. त्यांच्या प्रगत वैद्यकीय सेवेमुळे आज आमचा युवराज आमच्यासोबत आनंदाने जगत आहे—आणि आमच्या म्हातारपणाचं खरं टॉनिक बनला आहे.

एकूणच, या संपूर्ण प्रवासातून एक गोष्ट स्पष्ट होते—संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे, पण त्यातूनच खऱ्या आनंदाचा जन्म होतो. नातवंडे ही केवळ कुटुंबाची पुढची पिढी नसून, ती आपल्या आयुष्याला नवसंजीवनी देणारी शक्ती असतात. प्रेम, काळजी आणि विश्वास यांच्या जोरावर अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात. वैद्यकीय विज्ञान आणि मानवी जिद्द यांचा संगम जीवन वाचवू शकतो, याचा हा जिवंत पुरावा आहे. शेवटी, कुटुंबातील प्रेम आणि एकोपाच खरे आयुष्य समृद्ध करणारे टॉनिक ठरते.

**डॉ. दशरथ भोसले, विनोदी कथा लेखक, दापोली, जिल्हा रत्नागिरी.**




# 22 एप्रिल विश्व पृथ्वी दिवस. विषय :-सावधान !पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालिक नहीं”.

पृथ्वीचा दीवसेंदीवस ह्रास होत आहे आणि हवामानात आमुलाग्र बदल होत असून ऑक्सिजनची मात्रा सुध्दा दिवसेंदिवस कमी होत आहे ही घटना करोना महामारीच्या रुपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पहाली. यामुळे जगात लाखोच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली.याकरीता पृथ्वीला वाचवाण्यासाठी सर्वांनी “संकल्प”करण्याची गरज आहे.आज बदलत्या हवामानामुळे दिनांक 19 एप्रिल 2026 ला जगात विदर्भाची सर्वात हॉट शहरांमध्ये नोंद करण्यात आली.कारण विदर्भातील अकोला व वर्धा जिल्ह्याचे तापमान 45 अंश सेल्सिअसवर पोहोचले व इतर शहरांमध्ये 44 अंश सेल्सिअस पार केले असून संपूर्ण विदर्भ होरपळून निघाला आहे.जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने 1970 पासून “जागतिक पृथ्वी दीवस”साजरा करण्यात येतो.प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदुषणापासुन मुक्त झाले.भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदुषण दुर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते व यामुळे हवामान अक्राळविक्राळ रुप धारण करीत आहे.त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात.यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण,वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप,ज्वालामुखीचा उद्रेक,सुनामी, महाप्रलय, महामारी,साथीचे रोग,अती पाउस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागने अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे.ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात. 21 व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार,अनुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत.आतातर “बायोवेपन्स” म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे आणि याही पुढे जाऊन सध्याचे अमेरिका-इजरायल-इराण-हमास-हिजबुल्ला यांच्यातील युद्ध द्रोणच्या सहाय्याने लढले जात आहे.यामुळे पृथ्वी “तहस-नहस” होवू शकते.आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसते.सध्याच्या परीस्थितीत चीन जैविक हतीयार बनविणारा देश बनलेला आहे.चीन असा देश बनला आहे की तो नेहमीच जैविक हतीयाराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो.2019 मध्ये चीनने “कोरोणा व्हायरसचे” परीक्षण करून मानवजातीसोबत “खुनी तांडव” केल्याचे दिसून आले.आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चीन “पृथ्वीचा सर्वनाश” करतांना दिसतो.आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले,तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दीसतात.यामुळे दीवसेंदीवस पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येते.त्याचप्रमाणे



ग्लोबल वॉर्मिगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे.पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ,बिबट्या,अस्वल, हरीण,बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे.यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. त्यातुनच 1970 मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी “22 एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस” साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून 22 एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस म्हणुन साजरा केल्या जातो. आज जगात 196 हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर 1000 कोटींच्यावर लोकसंख्या आहे.त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने 22 एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी करोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पहाला आहे.परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे,ज्यांच्या परीसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडलीमध्ये तरी झाड लावुन “पृथ्वी दीवस” साजरा करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वाचवुन संगोपन करायला हवे.कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे.या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे.कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्वाची भुमिका बजावीत असते.जगातील “गिधाड” हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो.मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे “गिधाडांचे” काम असते.त्यामुळे अशुद्ध परीसर शुद्ध होतो. परंतु दु:खाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या नाहीच्या बरोबरीत दिसते.त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असने जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच जंगलातील संपूर्ण पशु-पक्षी-वृक्ष यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील.मानवजातीने स्वत:च्या स्वार्थापोटी “पृथ्वीची राखरांगोळी” केली आहे.पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील. आता अमेरिका-इजरायल-हमास-इराण-हिजबुल्ला-हुती यांचा संघर्ष व रशिया-युक्रेन संघर्ष यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट पृथ्वीवर ओढवल्याचे दिसून येते.आज मानवजातीने पुर्वेपासुन तर पश्रि्चम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिण पर्यंत,आकाश-पाताळा या संपूर्ण ठीकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे.यामुळे आज “पृथ्वी माता” सुध्दा भयभीत आणि चिंतेत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे.आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा “संकल्प” जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे.आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते.कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे.त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की.याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल.यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल. यामुळे विहीरी, तलाव व नदी-नाले,ओढे नेहमी जलमग्र राहील.आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे.म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत 700 फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत. मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त 50 ते 60 फुटांपर्यंत आहे. परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही.कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे. परंतु मानवाला अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल व अपंग होतांना दिसतो. वनवा लागने,महाप्रलय येणे,हीमकडा कोसळने, उष्णतामान वाढने,भुकंप येणे,सुनामी येणे, ढगफुटी ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वत:हुन ओढवलेल्या आहेत. यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो.यामुळे आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा “संकल्प” केला पाहिजे. पृथ्वीला वाचविने म्हणजे “महायुध्द” जिंकण्यासारखेच आहे हे महायुध्द जिंकण्यासाठी जगातून सर्वच स्तरातुन प्रयत्न व्हावयास पाहिजे.आज संपूर्ण जग कठीण घडीतुन प्रवेश करीत आहे. संपुर्ण मानवजातीपुढे तीन प्रश्न उभे ठाकले आहे एक आहे पृथ्वीचे रक्षण, दुसरे म्हणजे वैश्विक महामारी पासुन सुटका आणि तिसरे म्हणजे तिसऱ्या महायुद्धापासुन जगाला वाचविणे याबाबी तेव्हाच शक्य होवू शकते जेव्हा मानवजात खरी मानुसकी दाखवेल. कारण दीवसेंदीवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढुन पृथ्वीवरील जमिनीचा भुभाग कमी-कमी होतांना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबवीला पाहीजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे.यामुळे पृथ्वीचे रक्षण होईल व खऱ्याअर्थाने “पृथ्वी दिवस”मानल्या जाईल.”पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं” ही बाब मानवजातीने लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण केले पाहिजे.सध्याच्या परिस्थितीत पृथ्वीवर तिसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवतांना दिसत आहे. यामुळे पृथ्वीचा विनाश केव्हाही होवू शकतो याला ताबडतोब थांबायला हवे.पृथ्वी दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह व विनंती करतो की नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगल तोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा यामुळे “गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन” मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल.पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मुलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर.**



**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

## पान 1 वरुन

पक्षांच्या भूमिकेचा ना. पंकजाताईंनी यावेळी निषेध केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने आणलेल्या ऐतिहासिक 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ला विरोध करून काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी देशातील कोट्यवधी महिलांच्या आकांक्षांचा आणि हक्कांचा घोर अवमान केला आहे.वर्षानुवर्षे महिला आरक्षणाचे प्रश्न प्रलंबित ठेवणाऱ्या विरोधकांनी संसदेत या विधेयकाविरोधात भूमिका घेऊन आपली महिलाविरोधी मानसिकता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश महिलांच्या सक्षमीकरणासाठी पावले उचलत असताना, विरोधकांचा हा अडथळा देशातील जनता कधीही विसरणार नाही असं त्या म्हणाल्या.

महिला सक्षमीकरण आणि लोकशाही बळकट करण्यासाठी भारतीय जनता पक्ष कटिबध्द आहे, महिलांना त्यांचे हक्क मिळावेत यासाठी या महिलांविरोधी शक्तीविरूध्द आम्ही जोरदार लढा देऊ असं त्या म्हणाल्या. काँग्रेस, समाजवादी पक्ष, टीएमसी आणि डीएमके या पक्षांनी केवळ घटनादुरुस्ती किंवा मतदारसंघ पुनर्रचना विधेयकांनाच विरोध केला नाही तर त्यांनी भारतातील लाखो माता-भगिनी आणि मुलींचा विश्वासघात केला आहे असा आरोप ना. पंकजाताईंनी केला.

---------------------------------

उभे आहे. माझ्यावर विश्वास ठेवा, मी तुमचा विश्वास कधीच कमी होऊ देणार नाही."खरं सांगायचं तर माझं दुख मोठं आहे", असं म्हणताना सुनेत्रा पवारांचा कंठ दाटून आला. अश्रू अनावर झाले. पण अश्रूंना सावरत त्या पुढे म्हणाल्या, "माझं तर सर्वस्व हरवलंय, पण लाखोंचा पोशिंदा गमावलेल्या आणि आशेने माझ्याकडे पाहणाऱ्या या पोरक्या जनतेकडे पाहिल्यानंतर दादांचं स्वप्न, त्यांच्या कर्तव्याची जाणीव आणि त्यांच्या पश्चात माझ्यावर आलेली जबाबदारी या साऱ्यांच्या बळावर हे शिवधनुष्य उचलून मी पुढे चालत राहण्याचा निर्धार केला आहे. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही. पण त्यांच्या विचारांचा, कार्याचा वारसा पुढेझे नेण्याचा ताकदीने प्रयत्न करेन", असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.दु:खाला कवटाळून न बसता मी दादांचं कार्य पुढे नेण्याकरता त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून उभी आहे. माझ्याबरोबर कोणी असो वा नसो, जोपर्यंत तुम्ही बारामतीकर जनता माझ्या पाठीशी आहात, तोपर्यंत मी खचणार नाही, मागे हटणार नाही. मी एका संघर्षयोद्धाची सहचारिणी आहे. येसूबाई जशा लढल्या, अहिल्याबाईंनी जसा कारभार चालवला आणि आपल्या लोकांना न्याय दिला, त्या निष्ठेने मी तुमची सेवा करेन. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा ही महाराष्ट्राची ओळख आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचीही तीच विचारधारा राहिलेली आहे. यापुढेही ती तशीच राहील याची मी खात्री देते. बारामती माझी ताकद आहे. तुम्ही बारामतीकर माझ्या जीवाभावाच्या कुटुंबातील माणसं आहात, हीच भावना उराशी बाळगून सतत काम करत राहणार आहे", असा विश्वासही त्यांनी बारामतीकरांना दिला.

---------------------------------

देण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. स्थायी समितीच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या बैठकीला नगराध्यक्ष सौ पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, स्थायी समिती सदस्य वैजनाथ सोळंके, प्रा पवन मुंडे, सौ.अंजलीताई माळी,सौ जयश्रीताई गीते, योगेश मेनूकुदळे यांच्यासह नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, सर्व अधिकारी, विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

*एकाच छताखाली उपलब्ध होणार सर्व सेवा...*

"स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत महाराष्ट्र शासनाच्या विविध वैद्यकीय सहाय्यता योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच आयुष्मान भारत योजनेबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन नोंदणी, संबंधित कार्यालयांशी समन्वय आणि लाभार्थ्यांचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. या कक्षासाठी स्वतंत्र जागा, फर्निचर, संगणक, इंटरनेट, प्रिंटर आदी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय किमान एक प्रशिक्षित लिपिक/डेटा एंट्री ऑपरेटर आणि एक समन्वयक नियुक्त केला जाणार आहे.

नागरिकांना योजनांची माहिती देण्यासाठी माहितीपत्रके, हेल्पलाईन क्रमांक व मार्गदर्शक फलक लावण्यात येणार आहेत. तसेच प्राप्त अर्जांची नोंद ठेवून त्यांचा वेळेत पाठपुरावा करणे बंधनकारक राहणार आहे. कक्षाच्या कामकाजाचा मासिक अहवाल तयार करून मुख्याधिकारी आणि स्थायी समितीसमोर सादर केला जाणार आहे. नगर परिषद स्थायी समितीने हा महत्त्वाचा निर्णय घेत नागरिकांना आरोग्य सेवांचा लाभ अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. या कक्षामुळे गरजू नागरिकांना वेळेत वैद्यकीय मदत मिळण्यास मोठी मदत होणार आहे. लवकरच नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्रातील पहिला सुसज्ज असा "स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यान्वित करण्यात येईल अशी माहिती नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.

-----------------------------------

माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी आज मोंढा परिसरात जाऊन स्थानिक व्यापाऱ्यांची भेट घेतली आणि नगर परिषदेच्या मोहिमेची पाहणी केली. यावेळी व्यापाऱ्यांनी त्यांच्याकडे आपल्या अडचणी मांडल्या. या भेटीनंतर बोलताना देशमुख म्हणाले की, परळी हे ज्योतिर्लिंग वैजनाथाचे पावन क्षेत्र असल्याने येथे देशभरातून भाविक येतात. मात्र, मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे या भाविकांना आणि स्थानिकांना तासनतास वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागते. नगर परिषदेने ही मोहीम राबवताना कुणाचे हित न पाहता रस्ते मोकळे करावेत. मात्र रस्त्यावरील आणि फूटपाथवरील अतिक्रमण काढताना गरिबांवर अन्याय होऊ नये, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. मोठ्यांचे अतिक्रमण काढताना नगर परिषद नरमाईची भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

प्रशासनाने आधी पार्किंगची योग्य व्यवस्था करावी आणि फूटपाथवरील फेरीवाल्यांचे अतिक्रमण काढण्यापूर्वी त्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करावे असेही देशमुख यांनी स्पष्ट केले. तसेच अतिक्रमण सीमा निश्चित करून खुणा कराव्यात. तोंड बघून अतिक्रमण न काढता व्यापारी व नागरिकांना विश्वासात घेऊन ही मोहीम राबवावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी केली आहे. याबाबत दीपक देशमुख यांनी नगरसेवक नितीन बागवाले, व्यंकटेश शिंदे, शिवसेना शहराध्यक्ष वैजनाथ माने, वैजनाथ जोशी, गोविंद माने आदींसह न. प. उपमुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

-----------------------------------

(एसीबी) मंगळवारी दुपारी रंगेहात अटक केली.तक्रारदाराने आपल्या सोलर प्रकल्पाची पडताळणी करून देण्याची विनंती केली होती. हे काम करण्यासाठी कोमल शिंदे यांनी 18 हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारदाराने याबाबत बीड एसीबीकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची शहनिशा केल्यानंतर एसीबीने आष्टी येथील कार्यालयात सापळा रचला. मंगळवारी दुपारी जसा तक्रारदाराने पैसे देण्याचा प्रयत्न केला, तसा दबा धरून बसलेल्या पथकाने कोमल शिंदे यांना रंगेहात पकडले.बीड एसीबीचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले आणि त्यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. एका महिला अधिकाऱ्याला अशा प्रकारे लाच घेताना अटक झाल्यामुळे महावितरण विभागात मोठी खळबळ उडाली आहे. याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

-------------------------------------

सामाजिक क्रांतीचा संदेश रसिकांच्या मनात खोलवर रुजणार आहे.

समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची ज्योत अधिक तेजस्वी व्हावी, तसेच युवा पिढीने गीतांच्या माध्यमातून बाबासाहेबांचे विचार आत्मसात करावेत, या उदात्त हेतूने सचिनभाऊ कागदे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. भीमगीतांच्या स्वरातून उपस्थितांना प्रेरणा, अभिमान आणि सामाजिक जाणीवेचा जागर अनुभवायला मिळणार आहे.

या सांस्कृतिक सोहळ्यात बाबासाहेबांच्या जीवनप्रवासावर आधारित विविध प्रेरणादायी गीते सादर होणार असून, वातावरण भारावून टाकणाऱ्या या कार्यक्रमाबद्दल शहरात विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे.

या कार्यक्रमास पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बाबासाहेबांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक सचिनभाऊ कागदे यांच्यासह शरण मस्के (रिपाई ता. अध्यक्ष), कार्तिक कांबळे (नगरसेवक), भीमराव पोळे, यशपाल मुंडे, रवी मुळे, बापू गायकवाड, बाबा सरोदे, संदीप मस्के, नट्टू शिंदे, अतिष अदोडे, प्रदीप भोकरे, कैलास तरकसे, नितीन धाटे, महादू गवारे, सनी देवडे, राम मुंडे, महेश आदमाने, अजय ढगे, कुमार डेंगळे व समस्त भीमसैनिक परळी यांनी केले आहे.दरवर्षीप्रमाणे यंदाही परळीत आंबेडकर जयंतीनिमित्त विविध उपक्रम होत असले, तरी हा भीमगीतांचा महासोहळा विशेष आकर्षण ठरणार असून, सांची बौद्ध विहार परिसर 'जय भीम'च्या घोषणांनी दुमदुमणार, अशी भावना नागरिकांत व्यक्त होत आहे.

-------------------------------------

भूषण मानला जातो. यावर्षीच्या सोहळ्यासाठी नोंदणी पूर्ण झाली असून एकूण 21 मुंजी निर्धारित करण्यात आल्या आहे. या पवित्र मंगल सोहळ्यासाठी भागवतमर्मज्ञ ह. भ. प.बाळूमहाराज उखळीकर यांची आध्यात्मिक उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने परळी वैजनाथ नगरीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. तसेच नगरसेवक पदी नवनियुक्त झाल्याबद्दल माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी आणि नवनियुक्त नगरसेवक देवीप्रसाद ऊर्फ राजा पांडे, दीनदयाळ ना.सह. बँकेचे नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन ॲड. राजेश्वर देशमुख, दीनदयाळ ना.सह.बँकेचे नवनिर्वाचित संचालक डॉ.विवेक दंडे, वैद्यनाथ ना.सह.बँकेचे नवनिर्वाचित संचालक प्रकाश जोशी यांचाही गौरव केला जाणार आहे. तरी या उपनयन संस्काराच्या मंगलमय प्रसंगी आणि सत्कार समारंभास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ब्राह्मण बहुद्देशीय सभा, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

---------------------------------------------

घुगे पाथरुड, सार्थक राधेश्याम कुलकर्णी आवलगाव.

----------------------------------

आणि अलीकडील प्रकृतीचा विचार करून केवळ खबरदारी म्हणून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचेही सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

------------------------------------

विरोध होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे ही निवडणूक लढणार नसतील तर ही जागा काँग्रेसने मागितली असल्याचे सांगितले जाते. ज्येष्ठ नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासाठी ही जागा हवी असल्याची माहिती आहे. महाविकास आघाडीत सुरु असलेल्या या घडामोडींमुळे विधानपरिषद निवडणुकीत ट्विस्ट आला आहे.

## पान 4 वरुन

असल्याचे सांगितले. तर डॉ. सतीश गुट्टे यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकपर भाषणात संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. कैलास घुगे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,आज मिळालेले यश हे केवळ गुणांपुरते मर्यादित नसून तुमच्या कष्ट, शिस्त आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. शालेय जीवनात तयार झालेली अभ्यासाची सवय, वेळेचे योग्य नियोजन आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच तुम्ही हा टप्पा गाठला आहे. पुढील काळात स्पर्धा परीक्षा व उच्च शिक्षणाच्या वाटचालीत हीच मेहनत आणि चिकाटी कायम ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकत पुढे जाण्याची वृत्ती ठेवली, तर यश नक्की मिळते. असे मत त्यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.

दरम्यान, पालकांनीही आपल्या भावना व्यक्त करत शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला पालक व नागरिकांची चांगली उपस्थिती होती. संपूर्ण सोहळा उत्साहात पार पडला

--------------------------------------------

विद्धार्थ्यांना गुलाबांची फुले देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भास्कर( नाना) रोडे, प्रा डि जे वायमारे, प्रा विलास रोडे, सिद्धार्थ जगतकर, अंकुश आचार्य सर, सी.पी. खंडागळे सर, मिलिंद बनसोडे सर, राजू डोंबे इ उपस्थित होते.

----------------------------------------

त्याच वेळी तिथे उपस्थित असलेल्या अरमान रहीम शेख याने "तुझी मैत्रीण बाहेर गेली आहे, तोपर्यंत माझ्याकडे बस," असे म्हणत मुलीचा हात धरून तिला जबरदस्तीने स्वतःजवळ बसवले आणि गैरवर्तन केले.पीडित मुलगी प्रतिकार करत असतानाच कॅफेमधील इतर काही मुले तिथे आली. त्यांनी अरमानच्या तावडीतून मुलीची सुटका केली. घडलेल्या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीने घरी जाऊन पालकांना सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली.

या घटनेची माहिती मिळताच काही हिंदू संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. त्यांनी पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबाला धीर देत कायदेशीर प्रक्रियेत मदत केली. आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.माजलगाव शहर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पिंक पथकाचे प्रमुख महेश भोसले हे करत आहेत. या घटनेमुळे महाविद्यालयीन परिसरात खळबळ उडाली असून विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

-------------------------------------

आला. पाणीपुरवठा लाईनमधील 200×

450 रेड्यूसरला लिकेज झाल्यामुळे ही समस्या निर्माण झाली होती. सुरुवातीला दुरुस्तीचे काम दोन दिवस चालण्याची शक्यता होती. मात्र सभापतींनी तातडीने सूचना देत कर्मचाऱ्यांकडून युद्धपातळीवर काम करून घेतले आणि अपेक्षेपेक्षा कमी वेळेत दुरुस्ती पूर्ण केली. या बिघाडामुळे विद्यानगर, शारदा नगर, पंचशील नगर, माधवभाग एरियेशन, माणिकनगर, प्रियानगर, जलालपुर रोड, शंकरपार्वती नगर, मलिकपुरा, बसवेश्वर कॉलनी, वडरवाडा, मोंढा पाण्याची टाकी परिसर, आझाद नगर, जुने रेल्वे स्टेशन परिसर, हालगे गल्ली, उखळवेस पाण्याची टाकी परिसर, रोडे गल्ली, ताठे गल्ली, कालारात्री देवी मंदिर परिसर, गणेशपार, बिडगर गल्ली, बरकत नगर, सावतामाळी मंदिर परिसर, किर्ती नगर, सिध्देश्वर नगर, खंडोबाचा मळा, 40 फुटी रोड आदी भागांमध्ये पाणीपुरवठा तात्पुरता बंद होता. भर उन्हाळ्यात पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असताना प्रशासनाच्या तत्परतेमुळे परिस्थिती लवकर नियंत्रणात आली. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी सांगितले की, शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ व नियमित पाणीपुरवठा देणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. एअर वॉल दुरुस्ती करून पाणीपुरवठा अधिक सुरळीत होईल. या कामांना प्राधान्य देत आम्ही पाणीपुरवठा दर तीन दिवसांनी नियमित करण्याचा निर्धार केला आहे. नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी पाणी पुरवठा विभाग सतत प्रयत्नशील आहे." नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळावा तसेच कुठेही गळती किंवा तांत्रिक अडचण आढळल्यास तात्काळ कळवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

सध्या परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा सुरळीत सुरु असून, ज्या ठिकाणी अडचणी निर्माण होत आहेत त्या तातडीने दूर करण्यात येत आहेत. नगर परिषद पाणीपुरवठा विभाग प्रत्येक घरापर्यंत शुद्ध पाणी पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहे. कोणत्याही परिस्थितीत शहराला पाणी कमी पडू दिले जाणार नाही, अशी ठाम ग्वाहीही त्यांनी दिली.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी केले आहे.

-------------------------------------

हारे तिथे उपस्थित होते. गाडवे यांनी सरपंचांकडे बांधकाम परवानगीबाबत विचारणा केली असता, सरपंच भडकले.

सरपंचाने गाडवे यांना "तुला कशाचे बांधकाम करायचे आहे? तू इथून निघून जा," असे म्हणत शिवीगाळ केली. गाडवे यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, सरपंचाने त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यात गाडवे यांच्या डाव्या कानावर मार लागल्याने ते जखमी झाले. इतकेच नाही तर, "जर तू आता इथून गेला नाहीस, तर तुला जिवे मारून टाकीन," अशी धमकीही सरपंचाने दिली.

मारहाणीनंतर गाडवे यांनी आपल्या मुलाला फोन करून बोलावून घेतले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी बार्दापूर येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, तिथून त्यांना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वा. रा. ती. रुग्णालयात पाठवण्यात आले. उपचार घेतल्यानंतर दि. 16 एप्रिल रोजी गाडवे यांनी बार्दापूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन सरपंच भगवान रावसाहेब हारे यांच्याविरुद्ध भा.न्या. सं. कलम 115(2), 352, 352(2) नुसार तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

-----------------------------------------

मोजक्या दिवसात एवढ्या सर्व विद्यार्थ्यांचे उत्तरपत्रिका मूल्यांकन काम करणे, प्रश्ननिहाय प्राप्त गुण शासनाच्या पोर्टलवर नोंद करणे आणि आपला वर्गाचा अंतिम निकाल पत्रक तयार करून विद्यार्थी गुणपत्रक तयार करणे एवढे सर्व काम मोजक्या दिवसात करणे क्रमप्राप्त आहे.

रात्र थोडी सोगे फार अशी अवस्था असताना आपलं झालं थोडं आणि इवयाने धाडलं घोड अस परळी तालुक्यातील शिक्षकांची अवस्था बनली असुन

या सर्व धाकधूकीत पोट निवडणूक संदर्भात तालुक्यातील काही खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना या कामी नियुक्ती देण्यात आली आहे. दि 22 रोजी प्रशिक्षण, दि 27 रोजी साहित्य हस्तगत करणे आणि दि 28 रोजी मतदान प्रक्रिया हे सर्व काम करून नियुक्ती कर्मचारी यांनी शालेय विद्यार्थ्यांचे वार्षिक मूल्यांकन कधी करावे? गुण ऑनलाइन पद्धतीने कधी भरावे? वार्षिक निकाल पत्रक तयार करून विद्यार्थी गुणपत्रक कधी लिहावे हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. वास्तविक पाहता जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या प्राथमिक शाळा, इतर विभाग यांच्याकडे पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध असताना देखील जाणीवपूर्वक परळी तालुक्यात तहसील प्रशासन खाजगी शाळेतील शिक्षकांना विविध कामावर नियुक्ती देत असल्याची खंत (चीड) कर्मचारी दाखवून देत आहेत.

---------------------------------------

सातत्याने मी कामगार नेते भाई गौतम आगळे सर हे आमच्या सतत संपर्कात असल्याने तुम्हाला या पूढे आंदोलनाचे हत्यार उपसन्याची गरज पडणार नाही असे मी नगरपरिषद अध्यक्षा म्हणून आपणास शब्द देते. तसेच कर्मचारी भविष्य निर्वाह निधी चा, पि.एफ. कोड नंबर (यु.एन.ए. ) एक महिन्यात देण्यात येईल असेही लेखी पत्रात नमूद केले आहे.

त्या अनुषंगाने दिनांक 15 एप्रिल 2026 चे संतप्त कामगार टोकाची भूमिका घेणार होते. जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड, यांनी सुद्धा बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/ नगरपंचायत यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आढावा बैठक घेऊन इतिवृत्त तयार केले त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असे लेखी निर्देश दिले.

त्यामुळे नियोजित

असलेले आंदोलन स्थगित करण्यात आले, अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे बीड जिल्हाध्यक्ष भाई सुनील कांबळे शहराध्यक्ष भाई मनोहर मुंडे यांनी एका संयुक्त प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली.

---------------------------------

परभणी जिल्ह्यातील गवळी पिंपरी (ता. सोनपेठ) येथील रहिवासी संतोष बोकरे हा वसतीगृहात रुम नंबर 7 मध्ये राहून आपले शिक्षण पूर्ण करून त्यांनी 2002 साली महाराष्ट्र विद्यालयातून दहावी उत्तीर्ण केली. त्यानंतर योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई येथून बारावी शिक्षण पूर्ण करत पुढे शाहू कॉलेज, लातूर येथे वैद्यकीय शिक्षणाची तयारी केली. पुढे त्यांनी नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथून एमबीबीएस पदवी संपादन केली. तसेच पुण्यातील ससून हॉस्पिटल व बी. जे. मेडिकल कॉलेज येथून एमडी पूर्ण करून त्यांनी तेथे काही काळ सेवा दिली. सध्या ते आंध्र प्रदेशमधील एम्स येथे वरिष्ठ सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

सोमवार दि 20 रोजी त्यांनी शाळेला भेट देत आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी यश संपादन केल्याचे सांगत विद्यार्थ्यांनीही मोठी स्वप्ने पाहावीत व चिकाटीने प्रयत्न करून यश मिळवावे, असा सकारात्मक संदेश त्यांनी दिला.या भेटीदरम्यान त्यांनी ज्या वसतीगृहाच्या खोली नंबर 7 मध्ये वास्तव्य केले त्या खोलीत पाऊल ठेवताना क्षणभर वेळ थांबल्यासारखा वाटला. भिंती, खिडक्या, कोपरे—सगळंच जणू माझ्या जुन्या आठवणींनी भरलेलं होतं. संघर्षाचे दिवस, स्वप्नांची सुरुवात, आणि मोठं काहीतरी करण्याची आतली धग... सगळं डोळ्यासमोर उभं राहिलं. आज जिथे उभा आहे, त्या प्रवासाची खरी सुरुवात याच रुम नंबर 07 मधून झाली होती, ही जाणीव मनाला खोलवर भिडली असे सांगत शाळेतील शैक्षणिक पद्धतीही तितकीच प्रभावी आहे. नियमित अभ्यासक्रमासोबत अतिरिक्त वर्ग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, कॉम्प्युटर शिक्षण आणि शारीरिक शिक्षण यावर विशेष भर दिला जातो. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न येथे दिसून येतो कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या वतीने तसेच महाराष्ट्र विद्यालय मोहा तर्फे मुख्याध्यापक बोराडे सर, हरदास सर, दीक्षित सर, शेख सर व इतर शिक्षकांनी स्वागत केले. या प्रेरणादायी भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांच्या भविष्यासाठी नवी प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

------------------------------

पहिला व दुसरा क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

सामान्य ज्ञान स्पर्धेमध्ये जलद उत्तर देण्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक महत्त्वाची कौशल्ये विकसित होतात. त्वरित विचार करण्याची क्षमता विकसित होते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये निर्णयक्षमता, एकाग्रता, स्मरणशक्ती, आत्मविश्वास, वेळेचे व्यवस्थापन, स्पर्धात्मक वृत्ती व ताण-तणाव हाताळण्याची क्षमता विकसित होते. ही सर्व कौशल्ये विद्यार्थ्यांच्या एकूण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. शाळेच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

---------------------------------

संशोधक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ पंडित शिरसाट यांनी प्रास्ताविक केले डॉ. सुदर्शन अवस्थी यांनी MOU महत्व विशद केले. तसेच कार्यक्रमास डॉ. मनोज प्रकाश , प्रा सर्फराज शेख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमादरम्यान एमओयू कराराचा प्रसंग पार पडला. यावेळी विद्यावार्ता प्रकाशनाचे संपादक डॉ. बापू घोलप यांनी इतिहास संशोधनातील बदलती प्रवृत्ती, आधुनिक संशोधन पद्धती, तसेच संशोधन करताना आवश्यक असलेली वैज्ञानिक दृष्टी आणि साधनसामग्री यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे तसेच प्राथमिक स्रोतांच्या अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इतिहास विभागाने विशेष प्रयत्न केले. उपस्थितांनी व्याख्यानाचा मोठ्या उत्साहात लाभ घेतला.

------------------------------

# बौद्धांनो,राजकीय आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी सज्ज व्हा...

अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणावरून संपूर्ण राज्यात उलट सुलट चर्चांना उधान आलं आहे. अ ब क ड उपवर्गीकरणाची मागणी प्रथम भंडारा येथील विधानसभा सदस्य नरेंद्र भोंडेकर यांनी लावून धरली होती. त्यात एससी मधील 59 जातींपैकी फक्त बौद्धांचा,महारांचा विकास झाला बाकी 58 जातींच्या सवलती बौद्धांनी लाटल्या असा आरोप करून अ ब क ड उपवर्गीकरणाच्या भांडणाची सुरुवात केली. सध्या भोंडेकर किंवा बाकी चांभार शांत असून उपवर्गीकरणासाठी बौद्धांव्यतिरिक्त 58 जातींपैकी मांग उपवर्गीकरणाच्या लढ्यात प्रथम क्रमांकावर आहेत. उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्यांनी आमच्या लढ्याला समर्थन देऊ नये. आम्ही हा लढा स्वबळावर पूर्ण करु अशी मातंगाची भूमिका आहे. सोशल मीडियावर मातंगांचे अनेक ब्लॉग आहेत . सध्या मातंग विरुद्ध बौद्ध असा थेट सामना या ब्लॉग वरील चर्चेत दिसून येतो. बौद्ध आपण एकत्र राहू अशी भूमिका घेताना दिसतात. पण कोणत्याही परिस्थितीत आम्ही तुमच्याबरोबर नाही अशी टोकाची भूमिका मांगांनी घेतलेली दिसते आहे. बौद्धांना भाऊबंदकी ठेवायची आहे. महार,बौद्ध त्यामुळे उपवर्गीकरणाच्या विरोधात भूमिका मांडताना दिसतात. बौद्धांचा हा विरोध एससी मधील सामाजिक ऐक्यासाठी आहे. पण मांग ही भावना समजून घेण्याच्या मानसिकतेत नाहीत. मांगांच्या या भूमिकेमुळे आता बौद्धांमधील एक विचार प्रवाह अ ब क ड या उपवर्गीकरणाचं समर्थन करतांना दिसतो. तर बौद्धांमधील एक विचार प्रवाह या उपवर्गीकरणामुळे आपली ताकद कमी होईल, समाज दुभंगला जाईल अशी भीती व्यक्त करतांना दिसतो. ज्यांना ही भीती वाटते त्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की 58 जातींपैकी अगदी दोन-तीन टक्के लोक सोडले तर बौद्धांबरोबर कुणीही नव्हते. एस सी गटात जेवढ्या जाती आहेत त्या एक राहिल्या असत्या तर आजचे सामाजिक, राजकीय चित्र वेगळे राहिले असते. ज्यांना बौद्ध मनुवाद म्हणतात त्यांच्याच गळाला 58 जाती लागल्या आहेत. आजही हे लोक भेदभावात अडकून पडले आहेत. ते भाजप, शिवसेना, काँग्रेस....चे मतदार आहेत. त्यांनी महाराष्ट्रात बौद्धांच्या,महारांच्या नाही तर किमान फुले, शाहू,आंबेडकरांच्या बाजूने राहू असा विचार केला असता तर आजची राजकीय चळवळ यशस्वी झाली असती. ते पूर्वीही आणि आताही तसेच पुढे भविष्यात बौद्धांबरोबर राहणार नाहीत. मग 'आम्ही तुमचे किंवा तुम्ही आमचे' ही आपुलकीची भावना घेऊन त्यांच्या मतपरिवर्तनाची वाट बौद्ध का बघतात? आपल्यात ऐक्य रहावे यासाठी बौद्धांचा प्रयत्न आहे.त्यामुळे हे उपवर्गीकरण होऊ नये ही बौद्धांची धडपड आहे. पण त्यामुळे त्यांच्यात उलट संदेश जातो आहे. ते समजतात की आता यांचे नुकसान होणार आहे. म्हणून विरोध करीत आहेत.

मांगांचा विरोध इतका टोकाला गेलाय की आरक्षण देणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर त्यातील अनेकांना नकोसे वाटायला लागले आहेत. त्यांचे आदर्श ते लहुजी साळवे,अण्णाभाऊ साठे आणि मुक्ता साळवे यांना मानतात. जय लहुजी, जय अण्णाभाऊ असा जयजयकार आता ते करु लागले आहेत. आपले सामाजिक ऐक्य कायम ठेवण्याच्या हेतूने उपवर्गीकरणात विरोध करणाऱ्यां बौद्धांना ते लबाड लांडगे, भामटे आणि भिमटे म्हणतात. इतके कडवट शब्द बौद्धांना वापरणारे मांग आणि 58 जाती कधीतरी बौद्धांचे होऊ शकतील का? म्हणून त्यांच्याशी भाऊबंदकीचे नाते जोडण्याच्या भानगडीत बौद्धांनी पडू नये असं प्रांजळ मत व्यक्त करावसं वाटतं.

लहुजी साळवे पेशवे आणि इंग्रजांनी विरुद्ध लढले मांगांसाठी आणि एकूणच 58 जातींसाठी लहुजीचे कोणते काम आहे? डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्यलढ्यात काय योगदान आहे? असा प्रश्न विचारला गेला. त्याला बौद्धांनी आणि बौद्धेतर अभ्यासकांनी यापूर्वीच उत्तर दिले आहे. देश पारतंत्र्यात होता तेव्हा देशातील दलितसमूह धार्मिक आणि सामाजिक पारतंत्र्यात होता.बाबासाहेब हे पारतंत्र्य संपवण्याच्या कामात व्यस्त होते.

अण्णाभाऊ साठे यांनी भरीव साहित्य निर्मिती केली. त्यातून सामाजिक व्यथा मांडल्या. जे दुःख अण्णाभाऊंनी भोगलं आणि पाहिलं तेच बाबासाहेबांनीही भोगलं आणि पाहिलं. बाबासाहेबांनी विषमतेचे चटके सहन केले. बाबासाहेबही एखादा आत्मचरित्र लिहून मोकळे झाले असते. पण ते दुःख त्या वेदना आत्मचरित्रात खुरमुंडी घालून राहिलल्या असत्या. पण बाबासाहेबांनी ही सारी विषमता आणि त्यातून आलेले दुःख संपविण्यासाठी कायदाच करून टाकला. भारतीय संविधान या महाग्रंथात ते कायदे आहेत. आज त्याच संविधानातील अधिकारांसाठी मांगाची लढाई आहे. न्यायाची लढाई (?) लढतांना मांगांच्या मनात बौद्धांविषयी टोकाचा राग दिसतो. याच बौद्धांने, महाराने हे अधिकार दिलेत याचा या 58 जातींना विसर पडलेला दिसतो. त्यांच्या अनेक ब्लॉगवर मुक्ता साळवे,लहुजी आणि अण्णाभाऊ साठे यांचे उदात्तीकरण झालेलं बघायला मिळतं.त्यांच महत्व कमी आहे असं नाही.अण्णाभाऊंच्या साहित्याची किंमत नाही असेही नाही. पण बाबासाहेबांविषयी हा आदर दिसत नाही.बौद्धांना ते 'भिमटे' म्हणतात. यातून ते स्पष्टपणे जाणवतं.एकीकडे मातंग उपवर्गीकरणासाठी धडपडतांना दिसतो.तर दुसरीकडे आंबेडकरवादी मातंगाच्या परिषदा भरत आहेत.या परिषदांना बौद्धांनी भुलून जाऊ नये.त्यांचं त्यांना करू द्या.ही उपवर्गीकरण वाल्यांचीच पिलावळ आहे.तसे नसते तर उपवर्गीकरणाला आंबेडकरवादी मातंगांनी विरोध केला असता.

बौद्धांमध्ये एक गैरसमज आहे. उपवर्गीकरणामुळे उभी फूट पडेल,धर्म परिवर्तित मांग आपल्यात कसे येतील ? त्याचे सरळ उत्तर असे आहे,ते आपल्यापासून कायम अंतर राखून राहिले आहेत.त्यामुळे फूट पडण्याचा प्रश्नच नाही.धर्मांतरित मांग फटकून वागतील वगैरे समज काढून टाकला पाहिजे.जे धर्मांतरित आहेत त्यांच्याशी बौद्धांनी रोटी बेटी व्यवहार ठेवला पाहिजे. 58 जातीतील धर्मांतरितांचे बौद्धांनी स्वागत केले पाहिजे.आणि बौद्ध त्यात कमी पडणार नाहीत असा प्रचंड आशावाद वाटतो.

बौद्धांना वेगळी स्मशानभूमी नको. गेवराई येथे मांगाची महिला मरण पावली तेव्हा उच्चवर्णीय हिंदूंनी ते प्रेत सार्वजनिक स्मशानभूमीत दफन करण्यास विरोध केला होता. शेवटी अजिंक्य चांदणेंच्या मध्यस्थीने त्या मांग महिलेचे प्रेत दुसरीकडे दफन करण्यात आले होते. त्या घटनेला न्याय मिळावा म्हणून विधानसभा सदस्य अमित गोरखेंनी अनुसूचित जातींसाठी स्मशानभूमीचा मुद्दा उचलला आहे. वेगळ्या स्मशानभूमीचा बहुतेक प्रस्ताव आहे.अनुसूचित जातीच्या लोकांसाठी वेगळ्या स्मशानभूमीत बौद्धांचा अनुसूचित जाती म्हणून समावेश करु नये. कारण बाबासाहेबांनी काळाराम मंदिर आणि

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
बुधवार दि. 22 एप्रिल 2026


# माऊंट लिटरा झी स्कूल व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अकॅडमीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न

## कार्यक्रमास डॉ. सतीश गुट्टे, डॉ. संतोष मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती





परळी / प्रतिनिधी-

माऊंट लिटरा झी स्कूल, परळी-वै. व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता 10 वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष मुंडे व डॉ. सतीश गुट्टे उपस्थित होते. तसेच डॉ. रामेश्वर बांगड व प्रा. कैलास घुगे सर यांची विशेष उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यंदा 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनी शाळेचा गौरव वाढवला. त्यामध्ये तनुजा चंद्रकांत फड (97.8%), स्नेहा बाळाजी अकांगिरे (97.6%), श्रीवर्धन कैलास रेवनवार (97.4%), मैथिली विनोद जगतकर (96.6%) व साक्षी सिंह (95.2%) यांनी विशेष उल्लेखनीय यश संपादन केले.

तसेच अकीफ मुदस्सीर इनामदार, पुष्कर गिरीश मंधाना, आर्या अंगद ढाकणे, यश योगेश जोशी, अक्षता नागनाथ रासवे, वरद गजानन गंजेवार, सृष्टी धनंजय गडदे, प्रिती अच्युत जामगे, शरयू मुंजाहर मुंडे, श्रुती विजय भुतडा, अर्णव हनुमंत बिराजदार, राधिका विनायक तुर्णीकर व सिद्धिकी अनम ताजीन या विद्यार्थ्यांनीही 90 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवत यश मिळवले.

यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. संतोष मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत यशासाठी सातत्य, मेहनत व योग्य मार्गदर्शन आवश्यक पान 3 वर

# परळी भिमजयंती महोत्सव 2026 वतीने सलग 18 तास अभ्यास उपक्रम संपन्न



परळी:- विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक आदर्श जयंती उत्सव समिती, परळी आयोजित परळी भिमजयंती महोत्सव 2026 च्या वतीने यावर्षी दि.17 एप्रील ते 27 एप्रील यादरम्यान विविध कार्यक्रमांचे ज्यात भीमगीते, धम्मदेसना, व्याख्यान, भाषण स्पर्धा, निंबध स्पर्धा, विद्यार्थी डान्स इ. कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

काल दि.20 एप्रील रोजी परळी येथील डॉ भालचंद्र वाचनालयात, डॉ बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन म्हणून सलग 18 तास अभ्यास उपक्रम सकाळी 6:00 ते रात्री 12 वाजेपर्यंत घेण्यात आला. या अभ्यास उपक्रमात एकूण 40 विद्याथर्यांनी सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थी - विद्यार्थीनी वय वर्षे 18 पेक्षा जास्त वयाचे होते. सदरील अभ्यास उपक्रमाला सकाळी6:00 वाजता सुरुवात झाली, सुरुवातीला डॉ भालचंद्र वाचनालयाचे प्रमुख ग्रंथपाल गंगा जगतकर यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला व उपक्रम सुरु झाला. सकाळी 11:00 वाजता नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी व त्यांचे पती तथा नगरसेवक बाजीराव उर्फ भैया धर्माधिकार, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे सह अनेकांनी भेटी दिल्या. रात्री ठिक 12:00 वाजता सहभागी पान 3 वर

# कॅफेमध्ये बोलवून अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीवर 'पोक्सो' अंतर्गत गुन्हा दाखल

- माजलगाव शहरातील एका नामांकित महाविद्यालयासमोर असलेल्या कॅफेमध्ये अल्पवयीन मुलीला बोलावून तिच्याशी गैरवर्तन केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली



माजलगाव : शहरातील एका नामांकित महाविद्यालयासमोर असलेल्या कॅफेमध्ये अल्पवयीन मुलीला बोलावून तिच्याशी गैरवर्तन केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या तक्रारीवरून अरमान रहीम शेख या तरुणाविरुद्ध माजलगाव शहर पोलीस ठाण्यात पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील 16 वर्षीय मुलगी शहरातील एका महाविद्यालयात अकरावीत शिक्षण घेते. तिच्या वर्गातील मैत्रीण आयशा हिने प्रॅक्टिकल बुक नेण्यासाठी या मुलीला फोन करून बोलावले होते.मंगळवारी सकाळी 11 ते 12 च्या सुमारास पीडित मुलगी प्रॅक्टिकल बुक देण्यासाठी महाविद्यालयासमोर असलेल्या 'बेकर्स लॉन्स कॅफे' येथे पोहोचली. मात्र, तिथे तिची मैत्रीण हजर नव्हती. पान 3 वर

# न.प.पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांच्या दूरदृष्टी आणि तत्परतेमुळे दिड दिवसात पाणीपुरवठा सुरळीत

## ऐन उन्हाळ्यात 42 अंश तापमानातही पाणीपुरवठा केला पूर्ववत



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :– सध्या उन्हाळ्याच्या तीव्र लाटेमुळे तापमान 40 ते 42 अंशांपर्यंत पोहोचले असताना शहरातील काही भागांमध्ये तांत्रिक बिघाडामुळे पाणीपुरवठा खंडित झाला होता. अशा कठीण परिस्थितीतही नगर परिषदेच्या पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी तत्परता दाखवत अवघ्या दिड दिवसात पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत सुरु करून नागरिकांना मोठा दिलासा दिला.

आ.धनंजय मुंडे व लोकनेते प्रा. टी. पी. मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषदेच्या पाणी पुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांच्या तत्परतेमुळे दिड दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करण्यात पान 3 वर



# बांधकाम परवाना मागणाऱ्या 76 वर्षीय वृद्धाला सरपंचाकडून मारहाण; जिवे मारण्याची धमकी

## जवळगाव येथील सरपंचाची गुंडगिरी

महेंद्र गोदाम ग्रामीण प्रतिनिधी
घाटनांदुर



अंबाजोगाई तालुक्यातील जवळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात बांधकाम परवाना मागण्यासाठी गेलेल्या 76 वर्षीय वृद्धाला गावच्या सरपंचाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी बार्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावच्या प्रथम नागरिक असणाऱ्या व्यक्तीकडून वृद्ध व्यक्तींना अशाप्रकारे मारहाण होणे ही अतिशय निंदनीय घटना आहे. जवळगाव येथील सरपंच भगवान हारे यांच्याकडून अशाप्रकारचे कृत्य होण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी देखील त्यांच्याकडून आशास्वरूपाचे कृत्य घडले आहे; त्यामुळे येथील मुजोर सरपंचाची गुंडगिरी आता जनतेसमोर येत आहे.

फिर्यादी रखमाजी रामभाऊ गाडवे (वय 76, रा. जवळगाव) हे 15 एप्रिल रोजी दुपारी दीडच्या सुमारास आपल्या घराच्या बांधकाम परवानगीसाठी जवळगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात गेले होते. यावेळी गावाचे सरपंच भगवान रावसाहेब पान 3 वर

# निकालाच्या धावपळीत निवडणूक कर्तव्य

## शासन मायबाप शिक्षकांनी करावं तरी काय?




परळी / प्रतिनिधी शैक्षणिक वर्ष अंतीम टप्प्यावर असून राज्य स्तरावर घेण्यात येत असलेल्या संकलित चाचणी 2 (PAT 3) या परीक्षेचे मूल्यमापन पूर्ण करून ऑनलाईन पद्धतीने शासन स्तरावर नोंदी करून शालेय स्तरावर निकाल पत्रक 1 मे पूर्वी पूर्ण करणे क्रमप्राप्त असताना तहसील प्रशासनाने खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक कर्मचारी यांनी पोट निवडणूक कर्तव्यावर नियुक्ती दिल्याने नियुक्त कर्मचा-यांनी नेमकं करायचं काय? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

राज्य अभ्यासक्रम मंडळाच्या नियोजनाप्रमाणे या शैक्षणिक वर्षातील अंतिम चाचणी दि 22 एप्रिल रोजी समाप्त होत आहे. नियमानुसार विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल हा दि 1 मे रोजी जाहीर करणे क्रमप्राप्त असते. मागील काही वर्षांपासून शासन स्तरावर संकलित मूल्यमापन चाचणी घेण्यात येत असून या चाचणी मधील विद्यार्थीनिहाय अध्ययन निष्पत्ती निहाय प्राप्त गुण हे शासनाच्या चॅट बॅट प्रणालीवर ऑनलाइन पद्धतीने नोंद करणे बंधनकारक केले आहे. खाजगी अनुदानित शाळेतील एक शिक्षक कर्मचारी यांच्याकडे किमान चार वर्ग अध्यापन आणि 200 ते 300 उत्तरपत्रिका मूल्यांकन काम पूर्ण करावे लागते. या शैक्षणिक वर्षात शासन स्तरावरील संकलित चाचणी 2 ही दि 22 रोजी समाप्त होत असून पान 3 वर

# परळी नगरपरिषदेच्या अध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या मदतीने लेखी पत्र देऊन आंदोलन स्थगित



दिनांक 10 एप्रिल 26 थकीत वेतन व अनुषंगिक लाभ मिळावेत याकरिता झुंजार कामगार नेते भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली अन्नत्याग सुरु केले होते*

अखेर चौथ्या दिवशी परळी शहराच्या कर्तव्यदक्ष नगराध्यक्षा मा.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी लिखित पत्र देऊन आंदोलन स्थगित करण्याची विनंती केली. इथून पुढे तुम्हाला आंदोलन करण्याची गरज पडणार नाही आपण संवाद साधून तुमच्या सर्व मागण्या टप्प्याटप्प्याने मंजूर करू आणि तुमचे मुलभूत अधिकार मिळवून देण्यासाठी पान 3 वर

# महामानव डॉ.डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीचे कार्यकारणी जाहीर

- जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी महेंद्र गोदाम




अंबाजोगाई घाटनांदुर;- महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीची कार्यकारणी समाज बांधवांची मीटिंग घेत निर्णय घेण्यात आला की घाटनांदुर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष महेंद्र गोदाम ,उपाध्यक्ष अविनाश गोदाम ,नितीन गोदाम, राहुल कासारे,अनंत गोडबोले रवी गोदाम अमित रणखांब,महिंद्र गोडबोले यात ज्येष्ठ सुरेश गोडबोले, दत्तू गोदाम व लक्ष्मण गोदाम, सुनील कासारे संतोष गोदाम ,उत्तम गोदाम उमाकांत गोदाम यांच्या सहकार्याने समाज बांधवांच्या वतीने मीटिंग पार पडली.

# रूम नंबर 07 – जिथे स्वप्नांना पंख मिळाले

## जगविख्यात एम्समधील माजी विद्यार्थ्यांची भावनिक अनुभूती



परळी / प्रतिनिधी काही ठिकाणे आपण फक्त पाहतो, पण काही ठिकाणे आपल्याला आतून स्पर्श करून जातात. महाराष्ट्र विद्यालय मोहा ही अशीच एक जिवंत अनुभूती आहे. दिलेल्या भेटीत मला पुन्हा एकदा जाणवले की, ही केवळ शाळा नसून समाजपरिवर्तनाची एक सशक्त चळवळ आहे. असे भावनिक उद्गार आंध्र प्रदेश येथील प्रख्यात एम्स रुग्णालयात वरिष्ठ सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ.संतोष बोकरे यांनी केले.

ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था म्हणून केवळ वाच्यता नव्हे तर खऱ्या अर्थाने एक आदर्श नागरिक निर्माण करणारी शाळा म्हणून महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलीत महाराष्ट्र विद्यालय मोहा याची प्रचिती समोर आली आहे. पान 3 वर

# विद्यानिकेतन सीबीएससी शाळेत सामान्य ज्ञान स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : विद्यानिकेतन सीबीएससी शाळेमध्ये सामान्यज्ञान स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडली. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने व सक्रियपणे सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत इयत्ता पहिली ते सहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेची पहिली फेरी (प्रथम फेरी) प्रत्येक वर्गात घेण्यात आली, ज्यामध्ये प्रत्येक वर्गातून चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर दुसऱ्या फेरीत (द्वितीय फेरी) या निवडलेल्या विद्यार्थ्यांमधून पान 3 वर

# महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ

## मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारासाठी 4 मे पर्यंत पुरस्कारांसाठी अर्ज करा

बीड , दि. 21 (जिमाका) : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने सन 2026 साठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कारांसाठी नामांकन मागविण्यात येत आहेत. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देणे व मधपालकांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असून, गेल्या तीन वर्षांपासून ही योजना राबविण्यात येत आहे. तरी इच्छुकांनी आपले अर्ज दि. 4 मे 2026 पूर्वी संबंधित जिल्हा कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी केले आहे.

क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या यशस्वी मधपालकांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात येणार आहे. यातील एक पुरस्कार महिला मधमाळीसाठी राखीव आहे. पुरस्कारांची रक्कम अनुक्रमे प्रथम रु. 11 हजार, द्वितीय रु. 7 हजार व तृतीय रु. 5 अशी आहे.

दि. 20 मे 2026 रोजी जागतिक मधमाशी दिन निमित्त पुणे येथे आयोजित समारंभात पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

नामांकन अर्ज मंडळाच्या www.mskvib.org या संकेतस्थळावर तसेच जिल्हा खादी ग्रामोद्योग कार्यालयात उपलब्ध आहेत. पान 3 वर

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



दापोली वार्ताहर वराडकर बेलोसे महाविद्यालयामध्ये दिनांक 14 एप्रिल 2026 रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रभारी प्राचार्य प्रा. सुरेश खरात यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बाबासाहेबांच्या कार्याचा परिचय आपणा सर्वांना आहेच; परंतु आपण आज ज्या उंचीवर पोहोचलो आहोत, त्यामागे त्यांच्या कार्याचा मोठा वाटा आहे, हे विसरून चालणार नाही.

तसेच त्यांनी पुढे असेही मत व्यक्त केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले विचार आणि मूल्ये आचरणात आणून आपण मार्गक्रमण केले, तर आपले वैयक्तिक जीवन तसेच देशाचा सर्वांगीण विकास निश्चितपणे साध्य होईल.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इतिहास लेखन व आधुनिक संशोधन पद्धतीवर मार्गदर्शन संपन्न



परळी :नवगण महाविद्यालयाच्या इतिहास विभाग व विद्यावार्ता प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने "इतिहास लेखन आणि आधुनिक संशोधन पद्धती" या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालय आणि प्रकाशन यांच्यामध्ये एम ओ यु करार झाल्याचेही यावेळी प्राचार्य डॉ आबासाहेब हांगे यांनी सांगितले. या कार्यक्रमास प्राध्यापक, पान 3 वर